ISBN : 978-93-913-05-62-8

गो. सी. टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्ट द्वारा संचालित
(रजि. नं. ई १८२)

**गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

चांदूर बाजार, जि.अमरावती–४४४७०४ (महाराष्ट्र)

नॅक 'ब'⁺⁺ श्रेणी अधिस्विकृत (CGPA-2.89)

आयोजित

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. ११, १२ व १३ मार्च २०२२




# अर्थसुमती

स्मरणिका

संपादक
डॉ. संजय ज. कोठारी

भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली (ICSSR)

मराठी अर्थशास्त्र परिषद ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन दि. ११, १२ व १३ मार्च २०२२ अर्थसुमती स्मरणिका गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चांदूर बाजार

मराठी अर्थशास्त्र परिषद ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन

ISBN 978-93-913-05-62-8

# अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार आणि 21 वे शतक

प्रा.संजय दादासाहेब ठिगळे
मातोश्री बयाबाई कदम कन्या महाविद्यालय,कडेगाव,सांगली.
भ्रमणध्वनी क्र. 9422041929

प्रस्तावना:

महाराष्ट्राला साहित्य क्षेत्राची फार मोठी परंपरा आहे. ब्रिटिश काळात अनेक साहित्यिक महाराष्ट्रात आपली जबाबदारी पार पडत होते. ना.सी. फडके, वि.स. खांडेकर व ग. त्र्यं. माडखोलकर या मराठी साहित्यिकांचे मोठे फार मोठे होते.1 ऑगस्ट हा 1920 हा अण्णा भाऊ साठे यांचा जन्मदिवस जन्म दिवस.1920 हे अण्णा भाऊंचे जन्मशताब्दी वर्ष आहे.त्यामुळे हा थोर साहित्यिक घडला कसा त्यांच्या विचारसरणीवर कोणाकोणाचा प्रभाव होता? हा महान कलावंत, साहित्यिक, लोकशाहीर कष्टकऱ्यांच्या चळवळीतून कसा घडला.त्यांच्या क्रांतिकारी शाहिरीची,साहित्याची वैचारिक जडणघडण ज्या कामगार-कम्युनिस्ट चळवळीत झाली. अण्णा भाऊ साठे यांचे त्या चळवळीतील प्रत्यक्ष सक्रिय कार्य त्याबरोबरच त्यांच्या साहित्यातील आर्थिक बाजू जन्मशताब्दी निमित्ताने जाणून घेणे गरजेचे आहे.

अण्णा भाऊ साठे लोकांना अनेक अर्थाने परिचित आहेत.स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी जन्म घेतलेल्या अण्णाभाऊ साठे यांनी ब्रिटीशांची जुलमी राजवट जवळून पहिली होती त्याचा परिणाम त्यांच्या लेखनावर झालेला दिसून येतो. विशेषतः आर्थिक बाजू त्यांनी वेगळ्या पद्धतीने मांडली. ब्रिटीश राजवटीने केलेली लुट,अन्याय आणि फसवणूक त्यांनी आपल्या विविध कादंबरींच्या माध्यमातून मांडले. अण्णा भाऊंनी विविध साहित्यप्रकार फार कौशल्याने हाताळलेले. त्यांची एकूण साहित्य संपदा अचंबित करणारी आहे. 35 कादंबऱ्या, 8 पटकथा, 15 स्फुट कथा, एक प्रवासवर्णन, 3 नाटके, 12 उपहासात्मक लेख, 14 लोकनाट्ये, 10 पोवाडे ही एवढी मोठी साहित्यसंपदा अण्णा भाऊंनी लिहिली. अण्णा भाऊंनी 'जीवनासाठी कला' या अनुषंगाने आपली साहित्यसंपदा निर्माण केली. तसेच समाजातील वंचित, दीन दलित, कष्टकरी, स्त्रिया, भटके यांच्या व्यथा-वेदना आणि वंचितता आपल्या साहित्यातून मांडल्या. अण्णा भाऊंची कला समानता प्रस्थापित करणारी वाटते. अण्णा भाऊंच्या साहित्यातील सर्व व्यक्तिरेखा या अन्यायाविरुद्ध लढतात. तसेच त्यांच्या कथात दलितेतर व्यक्तीसुद्धा सामाजिक न्यायाच्या भूमिका घेताना दिसतात.

अण्णा भाऊ साठे यांचे,"दुनिया बदलायाचे"आवाहन करणारे हे गाणं बरेच काही सांगून जाते.

बदलाया रे दुनिया सारी दुमदुमली ललकार..!
शेतकरी,अन् दलित जनाला घेऊनिया पाठी...!
कामगार क्रांतीच्या अपुल्या ब्रिदासाठी........!
एकजुटीचा नेता झाला, कामगार तैयार... !



CamScanner

 ISBN 978-93-913-05-62-8

बदलाया रे दुनिया सारी दुमदुमली ललकार..!
शेतकरी.अन् दलित जनाला घेऊनिया पाठी...!
कामगार क्रांतीच्या अपुल्या ब्रिदासाठी........!
कोट करी ध्वजा लाल धरिली....... !
मेधासम आता फळी धरूनी अपुली......... ! .

लोकशाहीर, साहित्यिक कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांचे,"दुनिया बदलायाचे" आवाहन करणारे हे गाणं, कष्टकऱ्यांच्या चळवळीत जवळपास सात-आठ दशकं दुमदुमत राहिले. कामगार संघटना मोडीत काढण्याचे काम अगदी कौशल्याने सुरु आहे. एवढेच नव्हे तर शेतकरी आणि दलितांची होणारी वाताहत लक्षात घेता.जागतिकीकरणाच्या कचाट्यात अडकलेल्या अर्थव्यवस्थेला आजही अण्णाभाऊंच्याप्रेरक गाण्याची गाण्याची गरज आहे. अण्णा भाऊंनी त्यांच्या वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून व अनमोल कार्यातून कामगारांच्या समस्या, भांडवलदारांकडून होणारे शोषण, सावकार आणि जमीनदाराकडून होणारा जुलूम गरिबांची होत,चाललेली पिळवणूक आणि छळवणूक विषय फार पोटतिडकीने मांडले .त्यांच्या लिखाणातून जगातल्या गरिबीचे दर्शन दिसून येते. गरिबांच्याबद्दल असणारी कणव आणि कळवळा जाणवतो. अण्णा भाऊ यांनी फक्त विषमतेचे आणि दारिद्र्याचे दर्शन घडवून आणले नाही तर खरं तर श्रमिककामगारांचे लढे आणि परिवर्त-नाचा विचार याशिवाय अण्णा भाऊंच्या डोक्यात दुसरा कोणताच विषय नव्हता. अण्णा भाऊंनी फुलेआंबेडकर व -शाहू-मार्क्सचा वारसा साहित्याच्या माध्यमातून पुढे नेला. कष्टकऱ्यांच्या चळवळीचा पाठीराखा म्हणून अण्णा भाऊ साठे यांचे योगदान फार मोठे आहे.

कोणत्याही कलावंताच्या कलेची समीक्षा करत असताना आपणास त्यांच्या त्यांचे सामाजिक संदर्भ टाळता येत नाहीत व ते टाळू नयेत.अण्णा भाऊ जात-वर्गीय हितसंबंधाच्या विरोधी होते.प्रखर बुद्धिवाद, समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, समाजवादी विचार यांच्या वैचारिक साधनेवर भाऊंचा वाङ्मयीन दृष्टिकोन उभा आहे.' अण्णा भाऊ हे सामाजिक बांधिलकी मानणारे पुरोगामी विचारसरणीचे साहित्यिक होते. त्यांनी साहित्य हेच समाजपरिवर्तनाचे प्रचंड शस्त्र मानले. 'त्यांच्या साहित्यात लढाऊपणा, बंडखोरपणा, क्रांतिकारकता, हटवादी वृत्ती, अहंकारी मने, करारी वृत्ती इत्यादी जीवनस्पर्शी चित्रण दिसून येते.' 'फकिरा' ही कादंबरी त्याचे उत्तम उदाहरण आहे.

अण्णा भाऊंच्या साहित्य व कार्यातून कामगारांच्या समस्या, भांडवलदारांचे शोषण, सावकार, जमीनदार यांचा जुलूम, गरीबाची चाललेली पिळवणूक, छळवणूक विषय परखडपणे मांडलेले दिसून येतात. अण्णा भाऊंनी फुले-शाहू-आंबेडकर व मार्क्सचा वारसा साहित्याच्या माध्यमातून पुढे नेला.अण्णा भाऊंनी 'रडण्यासाठी जगू नका तर जगण्यासाठी लढा' असा संदेश आपल्या साहित्यातून दिला. अण्णा भाऊंच्या साहित्यात महात्मा फुल्यांची व्यापक दृष्टी, शाहू महाराजांची सामाजिक जाणीव आणि आंबेडकरांचा स्वाभिमान दिसून येतो. अण्णा भाऊ हे जात आणि वर्ग या दोघांचेही बळी



CamScanner

ISBN 978-93-913-05-62-8

असल्यामुळे त्यांनी आपल्या साहित्य कृतीतून जात आणि वर्गसंघर्ष याचे विवेचन केलेले दिसून येते. अण्णा भाऊंना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक लढ्यांनी, सामाजिक समतेसाठी सुरू असलेल्या वर्णअंताच्या विचारांनी प्रभावित केले होते.

**निष्कर्ष:**

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी जन्म घेतलेल्या अण्णाभाऊ साठे यांनी शोषण करणारी ब्रिटीश व्यवस्था फार जवळून पाहिली होती त्याचा परिणाम त्यांच्या लेखनावर झालेला दिसून येतो. ब्रिटीश राजवटीने केलेली लुट,अन्याय आणि फसवणूक त्यांनी आपल्या विविध कादंबऱ्यामधुन मांडली.भांडवलशाही व्यवस्थेचा निषेद करणारा,शेतकरी व कामगारांचे हक्क,असमान संपत्ती वाटप,असंघटीत वर्गाचे होणारे शोषण, दुर्बल घटकांची होणारी कोंडी याविरुद्ध त्यांनी आपल्या साहित्यातून आवाज उठविला त्यामुळेच पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडनीतील त्यांचे योगदान नाकारता येणार नाही.विशेषत: 21 व्या शतकात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण अर्थात खाउजा संस्कृतीतीने मोठ्या प्रमाणावर मांडलेला उन्माद आणि त्यामुळे कामगारांची चाललेली ससेहोलपट,समाजात वाढत चाललेली असमानता आणि आर्थिक शोषण विचारात घेता 21 व्या शतकात अण्णाभाऊ साठे यांची साहित्यसंपदा सर्वसामान्य माणसाच्या आर्थिक कल्याणाला चालना देणारी आहे. त्यांची विचारसरणी स्वीकारायला फार मोठ्या आर्थिक व सामाजिक इच्छाशक्तीची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


- अण्णाभाऊंचा संदेश (विनिमय पब्लिकेशन्स)
- अण्णा भाऊ सांगून गेले (विलास रणसुभे)
- अण्णा भाऊ साठे (मराठी कवी) — लेखक: बजरंग कोरडे, अनुवाद : विलास गिते, प्रकाशन : साहित्य अकादमी
- अण्णा भाऊ साठे (बालवाङ्मय, लेखक - बाबुराव गुरव)
- अण्णा भाऊ साठे विचारधन (विठ्ठल साठे)
- अण्णाभाऊ साठे व्यक्ती आणि वाङ्मय ( प्रा. डॉ. अंबादास सगट)
- अण्णा भाऊ साठेलिखित 'फकीरा'ची समीक्षा (डॉ. श्रीपाल सबनीस)
- क्रांतिकारी अण्णाभाऊ साठे (प्रा. गौतम निकम)
- समाज सुधारक लोकशाहीर अण्णा भाऊ साठे (संपादित, संपादक - ॲड. महेंद्र साठे)




CamScanner